SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

(असाधारण)

सोमवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२०

अधिसूचना

क्रमांक : १०९/२०२० दिनांक : ७.१२.२०२०

विषय : शैक्षणिक सत्र २०२०-२१ करीता सर्व सत्र / वर्षातील सर्व पदवी / पदव्युत्तर (पदवी व पदविका) अभ्यासक्रमास (शासनाकडून प्रवेश देण्यात येणाऱ्या अभ्यासक्रम वगळून) प्रवेश देण्याची अंतिम तिथीबाबत..

संदर्भ : विद्यापीठ निदेश क्र.१२/२०२०, दि.४.८.२०२० (परीच्छेद क्र.३ (vi) व
निदेश क्र.१७/२०२०, दि.१५.१०.२०२० (परीच्छेद क्र.३)

ज्याअर्थि, उपरोक्त संदर्भांकीत निदेशान्वये पदव्युत्तर पदवी / पदविकाच्या प्रथम सत्र / वर्ष वगळून सर्व अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयात / विद्यापीठीय शैक्षणिक विभागातील प्रवेश देण्याची अंतिम तिथी प्रसिध्द करण्यात आली होती.

आणि

ज्याअर्थि, कोव्हीड-१९ च्या वाढत्या प्रादुर्भावामुळे अनेक विद्यार्थी इतर राज्यांमध्ये लॉकडाऊनमुळे दिलेल्या मुदतीत प्रवेश घेऊ शकले नाही, तसेच उन्हाळी २०२० अंतिम सत्र / वर्ष परीक्षांचे निकाल नुकतेच जाहिर झालेले आहे व काही निकाल येणाऱ्या कालावधीत जाहिर होणार आहेत. त्याअनुषंगाने शैक्षणिक सत्र २०२०-२१ करीता प्रथम वर्ष/सेमिस्टर पदव्युत्तर, पदवी /पदविका अभ्यासक्रमासाठी विद्यापीठीय शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची अंतिम तिथी बाबतचा विषय क्र.९३ अन्वये दि.०४.१२.२०२० रोजी झालेल्या विद्या परिषदेसमोर विचारार्थ ठेवण्यात आला होता.

विद्या परीषदेने विचारविनिमय करुन घेतलेल्या निर्णयानुसार, आता सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठीय शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सर्व सत्र / वर्षातील सर्व पदवी /पदव्युत्तर (पदवी व पदविका) अभ्यासक्रमातील सत्र २०२०-२१ करीता प्रवेश देण्याची अंतिम तिथी ३१ डिसेंबर, २०२० पर्यंत राहील.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****